# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक – १४/१२/२०१७

## वानवडी पोलीसांकडुन चोरीस गेलेल्या ०६ मोटारी सायकली जप्त

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे (१) **ऋषीकेश तानाजी आतकर वय १८ वर्षे, रा.सर्वे नबंर ५६ गल्ली नंबर १, श्री हॉटेलचे मागे, बुध्दविहारा समोर, कृष्णानगर, मंहमदवाडी, पुणे (२) अस्लम तय्यब खान वय १९ वर्षे, रा.मातृशाळा बिल्डींग, कॅनॉल जवळ, घुले वस्ती, महादेवनगर, हडपसर, पुणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन वानवडी पोलीस ठाणेकडील ०५, हडपसर पोलीस ठाणेकडील ०१ असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.ना.२६४७ निसार खान यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, इसम नामे (१) ऋषीकेश तानाजी आतकर (२) अस्लम तय्यब खान यांनी वानवडी, हडपसर, परिसरातुन मोटार सायकलींची चोरी केलेली असुन ते सध्या रामटेकडी एम.आय.डी.सी. कचरा डेपो परिसरात फिरत आहेत. अशी माहीती मिळाली त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी रामटेकडी एम.आय.डी.सी. कचरा डेपो परिसरात सापळा लावुन त्यांना के.टी.एम. ड्युक मोटार सायकलसह ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या तपासात ते वापरत असलेली मोटार सायकल ही वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ५४५/२०१७ भा.दं.वि.कलम ३७९ मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीतांकडे सखोल तपास करता त्यांनी वानवडी, हडपसर, परिसरातुन मोटार सायकलींची चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याप्रमाणे एकुण १,६०,०००/- रुपये किमतीच्या ०६ मोटार सायकली जप्त करुन एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री निलेश मोरे सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री ऊमेश तावसकर वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.रमेश भोसले, पो.ना.युवराज दुधाळ, पो.ना.ज्ञानेश्वर गिरमकर, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.नासीर देशमुख, पो.शि.कैलास माळकर, पो.शि.नवनाथ खताळ यांच्या पथकाने केली.